# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - ७**

**(सभावृत्तांत)**

दिनांक - ०३/०५/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार दिनांक ०३/०५/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ढंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
८) मा.कुटे निर्मला संजय
९) मा.कोमल दिपक मेवानी
१०) मा.आशा धायगुडे-शेंडगे
११) मा.गोफणे अनुराधा देविदास
१२) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१३) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१४) मा.राजू मिसाळ
१५) मा.अमित राजेंद्र गावडे
१६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त,मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना,मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे–सहआयुक्त, मा.पाटील, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर,मा.इंदलकर,मा.लोणकर,मा.खोत-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ),मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे, मा.तांबे, मा.थोरात,मा.लडकत, मा.कुलकर्णी,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.घोडे,मा.कांबळे,मा.ओंभासे,मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.भोसले, मा.पाटील,मा.घुबे,मा.रत्नपारखी-कार्यकारी अभियंता,मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी,मा.बुरसे (मुख्य अभियंता, पीएमपीएमएल), मा.ऐवले- समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्र. ४१) जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत शहराच्या ४० टक्के भागात २४ x ७ पाणीपुरवठा योजना राबविणे – १००० मिनी व्यासाची पाईप लाईन रेल्वे क्रॉसींग करणेकरिता रेल्वेस रक्कम अदा करण्याबाबत...

विषय क्र. ४२) विधवा व घटस्फोटित महिलांना अर्थसहाय्य मिळणेबाबत...

--------------

१) **मा.उषा मुंढे**- दिनांक १२/०४/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.३) मध्ये ठराव क्र.१७५ मध्ये – १) **पान क्र.४ – प्रिंट मजकूर** – "परिवहन महामंडळाच्या सन २०१५-१६ च्या ताळेबंदातील आकडेवारी नुसार लेखापरिक्षण केले असता या ताळेबंदामध्ये एकूण तोटा र.रु.१६७.६९ कोटी इतका नमुद केलेला आहे" याऐवजी खालीलप्रमाणे वाचणेत यावा. "परिवहन महामंडळाच्या सन २०१५-१६ च्या ताळेबंदातील आकडेवारी नुसार लेखापरिक्षण केले असता या ताळेबंदामध्ये एकूण नफा र.रु.१५.९७ कोटी इतका नमुद केलेला आहे"

२) **पान क्र.७ वरील मुद्दा क्र.५ ते ८ दुरुस्त मजकूर खालीलप्रमाणे आहे -** ५) न.ता.वाडी इमारत क्र.६ मधील ७,५०० चौ.फुट जागा मे.सकाळ पेपर्स लि. यांना मासिक भाडे र.रु.३,७८,४२५/- व काकडे कन्स्ट्रक्शन कंपनी यांना ७८७ चौ.फुट, मासिक भाडे र.रु.७,८७५/- अशा दिलेल्या आहेत. वरील दोन्ही भाडे रकमांची तुलना केला असता मे.सकाळ पेपर्स लि. यांना र.रु.५०.४४ चौ.फुट प्रति महिना दर काकडे कन्स्ट्रक्शन कं. यांना र.रु.१०/- प्रति चौ.फुट प्रति महिना दिलेल्या आहेत. वरील दोन्ही जागा एकाच इमारतीमध्ये असून भाडे रकमेमध्ये एवढी तफावत दिसून येते. ६) मार्केट यार्ड इमारत क्र.५ मधील गाळेधारक सौ.जयश्री रत्नाकर सावंत थकबाकी र.रु.१७,८७,३८१/-,सौ.शारदा अशोक गोडसे थकबाकी र.रु.१७,८७,३८१/-,श्रीमती राजकुमारी गोयल थकबाकी र.रु.१७,८७,३८१/- या थकबाकी वसुल करणेकामी खात्याने कायदेशीर कार्यवाही का केली नाही? सदर व्यक्तीबरोबर केलेल्या करारनाम्याची मुदत सन २००३ मध्ये संपूष्टात आलेली आहे. सबब, कायदेशीर कारवाई करुन थकीत रक्कम वसुलात आणणे आवश्यक आहे. ७) कोथरुड इमारत क्र.७ मधील गाळेधारक लोकसेवा प्रतिष्ठाण लोकसेवा प्रतिष्ठाण व काकडे कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे भाडे दरामध्ये प्रति चौ.फुट मोठ्या प्रमाणावर तफावत दिसून येते. ते एकाच पातळीवर आणणेत यावेत. तसेच लोकसेवा प्रतिष्ठाण यांचेकडे रक्कम रुपये ९,७७,३४६/- व काकडे कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडे र.रु.५,६९,३२०/- थकबाकी दिसून येते. थकबाकी वसुलीबाबत खात्याने कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे. ८) पुणे स्टेशन इमारत क्र.८ मधील काकडे कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडे र.रु.५,०८,००२/- थकबाकी दिसून येते. वसुलीकामी खात्याने कायदेशीर कारवाई करावी. ३) **पान क्र.१६ वरील मुद्दा क्र.८ नंतरचा संपूर्ण दुरुस्त परिच्छेद खालीलप्रमाणे आहे –** सन २०१२-१३ मध्ये निव्वळ तोटा र.रु.६२.६५ कोटी, सन २०१३-१४ मध्ये र.रु.९९.४ कोटी, सन २०१४-१५ मध्ये र.रु.१६७.६९ कोटी व सन २०१५-१६ मध्ये र.रु.१५१.८ कोटी असा झालेला आहे. मा.राज्य शासनाचे आदेशान्वये दिनांक:- ०१/०४/२०१३ पासून जकात कर व दिनांक:-१५/०९/२०१५ पासून एसकॉर्ट फी चे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे उत्पन्न बंद करण्यात आलेले आहे. त्यामुळे कराच्या उत्पन्नावर असलेल्या मर्यादा व विकास कामाकरीता आवश्यक निधीचा विचार करता पीएमपीएमएलची संचलन तूट

महापालिकेने भरुन काढणे यावर मर्यादा येत आहे. उत्पन्न वाढ व खर्चामध्ये नियोजनात्मक घट करुन पीएमपीएमएलचे महापालिकेचे वरील अवलंबित्व शक्य तेवढे कमी करण्यावर संस्थेने प्रयत्न करणे गरजेचे आहे. अशी दुरुस्ती करणेत यावी.

दिनांक १२/०४/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.३) मध्ये - ठराव क्र.१७५ मध्ये – १) **पान क्र.४ – प्रिंट मजकूर** – "परिवहन महामंडळाच्या सन २०१५-१६ च्या ताळेबंदातील आकडेवारी नुसार लेखापरिक्षण केले असता या ताळेबंदामध्ये एकूण तोटा र.रु.१६७.६९ कोटी इतका नमुद केलेला आहे" याऐवजी खालीलप्रमाणे वाचणेत यावा. "परिवहन महामंडळाच्या सन २०१५-१६ च्या ताळेबंदातील आकडेवारी नुसार लेखापरिक्षण केले असता या ताळेबंदामध्ये एकूण नफा र.रु.१५.९७ कोटी इतका नमुद केलेला आहे" २) **पान क्र.७ वरील मुद्दा क्र.५ ते ८ दुरुस्त मजकूर खालीलप्रमाणे आहे -** ५) न.ता.वाडी इमारत क्र.६ मधील ७,५०० चौ.फुट जागा मे.सकाळ पेपर्स लि. यांना मासिक भाडे र.रु.३,७८,४२५/- व काकडे कन्स्ट्रक्शन कंपनी यांना ७८७ चौ.फुट, मासिक भाडे र.रु.७,८७५/- अशा दिलेल्या आहेत. वरील दोन्ही भाडे रकमांची तुलना केला असता मे.सकाळ पेपर्स लि. यांना र.रु.५०.४४ चौ.फुट प्रति महिना दर काकडे कन्स्ट्रक्शन कं. यांना र.रु.१०/- प्रति चौ.फुट प्रति महिना दिलेल्या आहेत. वरील दोन्ही जागा एकाच इमारतीमध्ये असून भाडे रकमेमध्ये एवढी तफावत दिसून येते. ६) मार्केट यार्ड इमारत क्र.५ मधील गाळेधारक सौ.जयश्री रत्नाकर सावंत थकबाकी र.रु.१७,८७,३८१/-, सौ.शारदा अशोक गोडसे थकबाकी र.रु.१७,८७,३८१/-, श्रीमती राजकुमारी गोयल थकबाकी र.रु.१७,८७,३८१/-या थकबाकी वसुल करणेकामी खात्याने कायदेशीर कार्यवाही का केली नाही? सदर व्यक्तीबरोबर केलेल्या करारनाम्याची मुदत सन २००३ मध्ये संपूष्टात आलेली आहे. सबब, कायदेशीर कारवाई करुन थकीत रक्कम वसुलात आणणे आवश्यक आहे. ७) कोथरुड इमारत क्र.७ मधील गाळेधारक लोकसेवा प्रतिष्ठाण लोकसेवा प्रतिष्ठाण व काकडे कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे भाडे दरामध्ये प्रति चौ.फुट मोठ्या प्रमाणावर तफावत दिसून येते. ते एकाच पातळीवर आणणेत यावेत. तसेच लोकसेवा प्रतिष्ठाण यांचेकडे रक्कम रुपये ९,७७,३४६/- व काकडे कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडे र.रु.५,६९,३२०/- थकबाकी दिसून येते. थकबाकी वसुलीबाबत खात्याने कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे. ८) पुणे स्टेशन इमारत क्र.८ मधील काकडे कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडे र.रु.५,०८,००२/- थकबाकी दिसून येते. वसुलीकामी खात्याने कायदेशीर कारवाई करावी. ३) **पान क्र.१६ वरील मुद्दा क्र.८ नंतरचा संपूर्ण दुरुस्त परिच्छेद खालीलप्रमाणे आहे –** सन २०१२-१३ मध्ये निव्वळ तोटा र.रु.६२.६५ कोटी, सन २०१३-१४ मध्ये र.रु.९९.४ कोटी, सन २०१४-१५ मध्ये र.रु.१६७.६९ कोटी व सन २०१५-१६ मध्ये र.रु.१५१.८ कोटी असा झालेला आहे. मा.राज्य शासनाचे आदेशान्वये दिनांक:- ०१/०४/२०१३ पासून जकात कर व दिनांक:-१५/०९/२०१५ पासून एसकॉर्ट फी चे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे उत्पन्न बंद करण्यात आलेले आहे. त्यामुळे कराच्या उत्पन्नावर असलेल्या मर्यादा व विकास कामाकरीता आवश्यक निधीचा विचार करता पीएमपीएमएलची संचलन तूट महापालिकेने भरुन काढणे यावर मर्यादा येत आहे. उत्पन्न वाढ व खर्चामध्ये नियोजनात्मक घट करुन पीएमपीएमएलचे महापालिकेचे वरील अवलंबित्व शक्य तेवढे कमी करण्यावर संस्थेने प्रयत्न करणे गरजेचे आहे. अशी दुरुस्ती करणेत येवून, त्या दुरुस्तीसह दिनांक १२/०४/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ३) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

२) दिनांक २८/०२/२०१७, ७/३/२०१७ (दु.२.१५ वा.), १०/३/२०१७ (दु.२.३० वा.) व १२/४/२०१७ (दु.२.१५ वा.) रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २६७) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

३) दिनांक ७/३/२०१७ (दु.२.३० वा.), १०/३/२०१७ (दु.२.३५ वा.) व १२/४/२०१७ (दु.२.३० वा.) रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २६८) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

४) दिनांक १९/४/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ५) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – २९० विषय क्रमांक – १

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-इ क्षेत्रीय कार्यालय, स्थापत्य

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.इ/स्था/कावि/२/१००५/२०१७ दि.२०/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

च-होली प्रभाग क्र.७ मधील कामांकरिता व त्याकरिता नियोजनबध्द आराखडा करून त्याप्रमाणे विकसीत करणेकामी सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात विकास कामांचा समावेश केला आहे महानगरपालिकेच्या विकास आराखड्यानुसार रस्त्यामधील विविध सेवा वाहिन्या यांत पाणीपुरवठा, जलनि:सारण, विद्युत, दुरसंचार, म.रा.वि.वि.कं. यांचेसह महानगरपालिकेच्या सर्व आवश्यक विभागांचे एकत्रित नियोजित मागणीनुसार रस्ता विकसीत करणे व स्थापत्य विषयक कामांच्या बाबींचे पुर्वगणपत्रक तयार करणे व निविदा बनविणेसह कामाची देखरेख करणे, इ. निविदा पुर्व (Pre Tender Activity) व निविदा पश्चात (Post Tender Activity) कामे करावी लागणार आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपरोक्त संबंधित अशा विविध प्रकल्पांसाठी सल्लागार मे. पेव्हटेक कन्सल्टंट यांनी काम केले आहे. तसेच महानगरपालिकेच्या विविध रस्त्यांसाठी व बी.आर.टी.एस. रस्त्यांसाठी मे.पेव्हटेक कन्सल्टंट यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली कामे प्रगतीपथावर आहेत. या बाबींचा विचार करता उपरोक्त विषयकामी प्रभाग क्र.७ मधील विकासकामांसाठी मे.पेव्हटेक कन्सल्टंट (श्री.विकास ठाकुर) यांची सल्लागार म्हणून नेमणूक करून मनपाच्या प्रचलित दरानुसार निविदा पुर्व (Pre Tender Activity) व निविदा पश्चात (Post Tender Activity) साठी स्विकृत निविदा किंमतीच्या (Accepted Tender Cost) ०.८०% व निविदा पश्चात (Post Tender Activity) साठी १.४५% फी अधिक सेवाकर (Service Tax) इ. या प्रमाणे देय निश्चित करून विषयांकित कामासाठी मे.पेव्हटेक कन्सल्टंट यांची नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २९१ विषय क्रमांक – २

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-नागरवस्ती विकास योजना

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/०६/कावि/३५४/२०१७ दि.३०/३/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नागरवस्ती विकास योजना विभागाकडील सन २०१५-१६ मधील प्रपत्र अ मधील २१ पात्र लाभार्थींना प्रती लाभार्थी दरमहा रक्कम रू.२,०००/- या प्रमाणे माहे एप्रिल-२०१६ ते मार्च- २०१७ या कालावधीकरिता प्रति लाभार्थी रक्कम रु.२४,०००/- (बारा महिन्यांचे) या प्रमाणे एकूण रक्कम रु.५,०४,०००/- (रक्कम रू पाच लाख चार हजार फक्त) व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात माहे सप्टेंबर २०१६ अखेर प्राप्त एकूण १९ पात्र लाभार्थींना प्रति लाभार्थी दरमहा २,०००/- या प्रमाणे माहे ऑक्टोंबर २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीकरिता प्रति लाभार्थी रक्कम रु.१२,०००/- प्रमाणे (अक्षरी रक्कम रु बारा हजार फक्त) याप्रमाणे एकूण रक्कम रु.२,२८,०००/- (अक्षरी रक्कम रु दोन लाख अठ्ठावीस हजार फक्त) असे एकूण रक्कम रु.७,३२,०००/- (अक्षरी रक्कम रु सात लाख बत्तीस हजार) इतका खर्च अपेक्षीत आहे. सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात "एच.आय.व्ही./एड्स बाधित मुलांचा सांभाळ करणा-या पालकांना अर्थसहाय्य" या उपलेखाशिर्षावर रक्कम रु.१२,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आली आहे. त्यामधून खर्च करण्यात येईल.पात्र लाभार्थिंना अर्थसहाय्य अदा करण्याकरिता येणा-या रक्कम रू.७,३२,०००/- (अक्षरी रक्कम रु.सात लाख बत्तीस हजार फक्त) चे खर्चास तसेच यानंतर अपात्रतेची पुर्तता करून पात्र ठरणा-या लाभार्थींना अर्थसहाय्य देणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय-** आयुक्त साहेबांनी खूप चांगली सूचना केली आहे की,एच.आय.व्ही./एड्स बाधित मुलांना अर्थसहाय्य देण्याच्या योजनेची अंमलबजावणी अशा संस्थांशी संपर्क साधून त्यांच्याकडून अशा मुलांची यादी मिळवावी. अशा मुलांकडून फॉर्म भरून घेऊन त्यांना अर्थसहाय्य वाटप केले गेले पाहीजे. त्यावर ताबडतोब अंमलबजावणी करण्यात यावी. कामाच्या जबाबदारीचे वाटप करण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २९२ विषय क्रमांक – ३

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग- नागरवस्ती विकास योजना

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/०५/कावि/६३/२०१७ दि.२०/४/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नागरवस्ती विकास विभागाकडील २४ अपात्र अर्जांपैकी ०४ अपात्र अर्जदारांनी कागदपत्रांची त्रुटीपुर्तता केल्याने त्यांचे अर्ज पात्र झाल्याने त्यांना इ.१२ वी नंतरचे वैद्यकिय (MBBS, BAMS, BHMS, BUMS, BDS) MBA व अभियांत्रिकी प्रथम वर्ष पदवी परिक्षा यांसारखे उच्च शिक्षण घेणा-या लाभार्थ्यींना योजनेचा लाभ देणेकामी र.रु.१५,०००/- अर्थसहाय्य देणेकामी र.रु.६०,०००/- खर्च अपेक्षित आहे. पात्र अर्जदार लाभार्थ्यांना लाभ देणेकामी व अपात्र अर्जांच्या कागदपत्रांची तृटीपुर्ततेनंतर पात्र होणा-या अर्जदार लाभार्थ्यांना दि.३१/०८/२०१७ पर्यंत लाभ देणेकामी अर्थसहाय्य मंजुर करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २९३ विषय क्रमांक – ४

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग- नागरवस्ती विकास योजना

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/०५/कावि/६२/२०१७ दि.२०/४/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

नागरवस्ती विकास विभागामार्फत मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. मा.महानगरपालिका सभा ठराव क्र.५२१ दि.५.७.२०१४ अन्वये मंजूर धोरणानुसार मागासवर्गीय कल्याणकारी योजना क्र.०१ अन्वये इ.५ ते इ ७ वी मधील विद्यार्थ्यांना वार्षिक र.रु.२०००/- व इ.८ ते इ.१० वी मधील विद्यार्थ्यांना वार्षिक र.रु.३०००/- शिष्यवृत्ती देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात वर्तमानपत्रामध्ये जाहिर प्रकटन प्रसिद्ध करुन अर्ज मागविले होते त्यानुसार शिष्यवृत्ती मिळणेकामी एकुण २८४९ अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर अर्जांची अटी शर्तीनुसार तपासणी केली असता १९८३ अर्ज पात्र झाले. त्यानुसार इ.५ ते ७ वी मधील ८२४ पात्र विद्यार्थ्यांना प्रत्येकी र.रु.२०००/- या प्रमाणे र.रु.१६,४८,०००/- व इ.८ वी ते १० वी मधील ११५९ पात्र विद्यार्थ्यांना प्रत्येकी र.रु.३०००/- प्रमाणे र.र.३४,७७,०००/- असे एकूण र.रु.५१,२५,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक्कावन्न लाख पंचवीस हजार फक्त) इतकी रक्कम पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणेत आलेली आहे. प्राप्त अर्जांमध्ये १९८३ पात्र विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ देणेत आलेला असुन उर्वरीत ८६६ विद्यार्थ्यांना लाभ देणे आवश्यक आहे. तरी ८६६ पैकी १५९ अपात्र अर्जांच्या कागदपत्रांची तृटीपुर्तता करुन पात्र झाल्याने इ.५ वी ते ७ वी ८२ पात्र विद्यार्थ्यांना व इ.८ ते इ.१० वी ७७ पात्र विद्यार्थ्यांना प्रत्येकी २०००/- व ३०००/- रुपये अर्थसहाय्य देणेकामी र.रु.३,९५,०००/- खर्च अपेक्षित आहे. तरी पात्र अर्जदारांस त्याचे इयत्ते नुसार शिष्यवृत्ती मंजुर करणेस व अपात्र अर्जांच्या कागदपत्रांची तृटीपुर्ततेनंतर पात्र होणा-या अर्जदारांस त्याचे इयत्ते नुसार दि.३१/०८/२०१७ पर्यंत लाभ देणेकामी शिष्यवृत्ती मंजुर करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय-** समूह संघटकांची आवश्यकता आहे तर तीन महिने आधीच प्रोसेस चालू करुन पदे भरा. स्थायी समितीने सर्वांना आदेश दिला आहे की, मुदतवाढीचा विषय आणायचा नाही. आपण महिला बालकल्याण योजनेसाठी अंदाजपत्रकात जवळजवळ ५० कोटी तरतूद ठेवली आहे. महिला बालकल्याण विभाग सक्षम झाला पाहिजे. अनेक वेगवेगळ्या योजना प्रभावीपणे अंमलात याव्यात. महापालिकेचे नाव झाले पाहीजे.

श्री.ऐवले यांनी फिल्डवर काम करावे. अधिकारी ऑन फिल्ड पाहीजेत. स्थायी समितीने केलेल्या आदेशाचे उल्लंघन होते आहे. इथून पुढे काहीतरी स्ट्रीक्ट ऍक्शन घ्यावी लागणार आहे. विद्यार्थ्यांसाठी महापालिका कोट्यावधी रुपये खर्च करते. चेक मिळायला ६/६ महिने लागतात, इतका वेळ लागला नाही पाहिजे.

मा.पोमण साहेब यांनी येत्या १५ दिवसांत सीएफसी केंद्रचालकांबरोबर बैठक बोलवावी. सीएफसी केंद्रचालकांना बोलवून कडक निर्देश द्यावेत की, त्यांनी फॉर्म घेताना तो तपासून कोणकोणती कागदपत्रे कमी आहेत हे सांगितले पाहीजे. त्याची चेकलिस्ट दिली पाहीजे. नुसती पावती देतात, असे चालणार नाही. नागरवस्ती विभागाचे फॉर्म गहाळ होतात, कागदपत्रे गहाळ होतात अशा तक्रारी येत असतात. या कामात सुसूत्रता आणावी. ७ जूनला शाळा सुरु होतात. सगळ्या योजनांचे फॉर्म उपलब्ध करुन द्यावेत.

मा.आवारी (प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ) यांनी सन २०१६-१७ साठी महापालिकेच्या शाळा आणि खाजगी शाळा यांमध्ये पाचवी ते आठवी आणि आठवी ते दहावी इयत्तेत एकूण किती मागासवर्गीय विद्यार्थी शिकत आहेत, याचा डाटा पुढील सभेत द्यावा. मनपाच्या शाळांतील शिक्षकांना विश्वासात घेऊन त्यांच्याकडे अर्ज द्यावेत. त्यांना समजून सांगून त्यांच्याकडून कागदपत्रांची पूर्तता करुन घ्यावी. मनपाच्या शाळांतील विद्यार्थ्यांनी सीएफसी केंद्रावर न जाता त्यांचे अर्ज शिक्षकांकडून शाळांमध्ये भरुन घेतलेतर या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होईल. काय नाविण्यपूर्ण करता येईल याकडे लक्ष द्यावे. आपण सगळ्या शाळांना पत्र द्यावे. त्यात नमूद करावे की, पिंपरी चिंचवड महानगरपालिका अशा प्रकारची योजना राबविते आहे. महापालिका विद्यार्थ्यांना पैसे देणार आहे. त्यांच्याकडून विद्यार्थ्यांची माहिती घ्यावी. सर्व अनुदानित/विनाअनुदानित माध्यमिक शाळांमध्ये कळवावे. नागरवस्ती विभागाकडून फॉर्म घ्यावे. शिक्षण विभागात महापालिकेच्या शाळांसाठी केंद्र सुरु करावे. तिथे या कामासाठी एखाद्या क्लार्कची नेमणूक करावी. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळांमध्ये प्रोत्साहन देण्यासाठी काय काय नियम आहेत त्याचा आधार घ्यावा. त्यानुसार शाळांना पत्र द्यावे. फॉर्म भरताना विद्यार्थ्यांकडे रहिवास पुरावा म्हणून रेशन कार्ड नसल्यास पासपोर्टही चालेल, असे अर्जात नमूद करावे. आपल्याकडे अर्ज थेट पद्धतीने स्विकारण्याची यंत्रणा विकसित करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २९४ विषय क्रमांक – ५

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/८५/२०१७ दि.२०/४/२०१७

मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सहा.आयुक्त, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभाग यांचे अखत्यारित असलेले अँम्बेसिडॉर वाहन क्र. एमएच-१४-एई-८०५५ या वाहना करीता नविन टायर्स/ट्युब पाच नग खरेदीसाठी शासन मान्य दराने उत्पादित कंपनीचे विक्रते मे.एम आऱ एफ. लि. यांना त्यांचे दरपत्रका नूसार र.रु.१४,६०५/- (अक्षरी र.रू.चौदा हजार सहाशे पाच फक्त) करारनामा न करता आगाऊ स्वरूपात अदा करण्यास मा. आयुक्त यांचे कडील आदेश क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/९६०/२०१६ दि.१८/१०/२०१६ अन्वये दिलेली असल्याने लेखाशाखेकडून धनादेश फक्त र.रू.१४,६०५/- देणेत आलेला आहे. दरम्यान उत्पादित कंपनीने टायर्स/ट्युब च्या दरामध्ये वाढ केलेने र.रु.१४,६०५/- चा धनादेश व दरवाढ रक्कम रुपये फक्त ४/- रोख स्वरुपात भरुन नविन टायर्स/टयूब पाच नग खरेदी करुन वाहनास बसविणेत आलेले आहेत. मे.एम आर एफ लि. यांनी बील क्र.४२९३८८४६१ दिनांक ०९/१२/२०१६ अन्वये रक्कम रुपये १४६०५+४=१४,६०९/- एकत्रित रक्कमेचे बील दिलेले आहे. आगाऊ स्वरुपात देणेत आलेली रक्कम रुपये १४,६०५/- चे समायोजन करणेस व दरवाढ पोटी रोख स्वरुपात अदा करणेत आलेली रक्कम रुपये ४/- फक्त संबंधितास अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २९५ विषय क्रमांक – ६
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/८४/२०१७ दि.२०/४/२०१७

मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रशासन अधिकारी, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभाग यांचे अखत्यारित असलेले टाटा सुमो वाहन क्र.एमएच-१४-एच-९५६५ या वाहना करीता नविन टायर्स/ट्युब पाच नग खरेदी साठी शासन मान्य दराने उत्पादित कंपनीचे विक्रते मे. जे के टायर अँन्ड इंडस्ट्रिज, लि. यांना त्यांचे कोटेशन नूसार र.रु.२३,००७/- (अक्षरी र.रू.तेवीस हजार सात फक्त) करारनामा न करता आगाऊ स्वरूपात अदा करण्यास मा. आयुक्त यांचे कडील आदेश क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/९५७/२०१६ दि.१७/१०/२०१६ अन्वये दिलेली असल्याने लेखाशाखेकडून धनादेश फक्त र.रू.२३,००७/- देणेत आलेला आहे. दरम्यान उत्पादित कंपनीने टायर्स/ट्यबच्या दरामध्ये वाढ केलेने र.रु.२३,००७/- चा धनादेश व दरवाढ झालेली रक्कम रुपये २,८८८/- रोख स्वरुपात भरुन नविन टायर्स/ट्युब पाच नग खरेदी करुन वाहनास बसविणेत आलेले आहेत. मे.जे के टायर अँन्ड इंडस्ट्रिज, लि. यांचेकडे रोख स्वरुपात अदा केलेल्या पावतीचा क्र.११० दिनांक २१/११/२०१६ असुन त्यांनी र.रु.२३००७+२८८८=२५,८९५/- (अक्षरी र.रू.पंचवीस हजार आठशे पंच्यान्नव फक्त) एकत्रित रक्क्मेचे मुळ बील क्र.२६६००७४१६५ दिनांक २१/११/२०१६ दिलेले आहे. आगाऊ स्वरुपात देणेत आलेल्या रक्कम रुपये २३,००७/- चे समायोजन करणेस व दरवाढ पोटी रोख स्वरुपात अदा केलेली रक्कम रुपये २,८८८/- फक्त सहा.आयुक्त, झोनिपु विभाग यांना अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २९६ विषय क्रमांक – ७
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-माहिती व जनसंपर्क
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/३/कावि/१९७/२०१७ दि.२१/४/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दि.२८/०४/२०१७ रोजी महात्मा बसवेश्वर जयंतीचे औचित्य साधून दि.२७/०४/२०१७ ते दि.२९/०४/२०१७ या कालावधीत अंकुशराव लांडगे नाटयगृह, भोसरी तसेच अन्य ठिकाणी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत विविध प्रबोधनात्मक व सांस्कृतिक कार्यक्रम तसेच प्रवचन व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. याकामी फ्लेक्स बॅनर छपाई व फ्रेम भाडे, मान्यवर/कलाकार चहापान, भोजन व्यवस्था, कलाकारांचे मानधन, निवास, नाटयगृह भाडे इ. करीता थेट पध्दतीने र.रु.१,३०,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख तीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २९७ विषय क्रमांक – ८
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-फ क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.फक्षेका/नि/कावि/२२२/२०१७ दि.२१/४/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालयाकडील नि.नो.क्र.**1/17-2016-17** मधील अ.क्र.1 अन्वये प्रभाग क्र.१ रूपीनगर तळवडे परिसराती नाम फलक, FRP वाचनालय, बेंचेस, संडास मुता-या बसविणेकामी मे.अडॅप्ट एंटरप्रायजेस नि.र.रु.**9,24,290/-** (अक्षरी र.रु.नऊ लाख चोवीस हजार दोनशे नव्वद फक्त) पेक्षा 2.10% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २९८ विषय क्रमांक – ९
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग- फ क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.फक्षेका/नि/कावि/२२४/२०१७ दि.२१/४/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालयाकडील नि.नो.क्र.**1/21-2016-17** मधील अ.क्र.1 अन्वये प्रभाग क्र.१ तळवडे-रूपीनगर येथे **FRP** वाचनालय मुतारी बोर्ड बेंचेस व बसथांबे बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.अडॅप्ट एंटरप्रायजेस नि.र.रु.**9,25,370/-** (अक्षरी र.रु.नऊ लाख पंचवीस हजार तीनशे सत्तर फक्त) पेक्षा 2.10% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २९९ विषय क्रमांक – १०
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-माध्यमिक शिक्षण
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/५९/१७ दि. २४/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पी.एम.पी.एम.एल यांना सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील मोफत बसपास योजने अंतर्गत विविध उपक्रम या लेखार्शिषातुन आगावू अदा केलेल्या २,००,००,०००/- (अक्षरी र.रू. दोन कोटी फक्त) या रकमेचे समायोजन करणेस व ऊर्वरीत रक्कम रु.१,१७,२८,२७८/- (अक्षरी र.रू. एक कोटी सतरा लाख अठ्ठावीस हजार दोनशे अठ्याहत्तर फक्त) विविध उपक्रम या लेखार्शषातुन खर्ची टाकुन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३०० विषय क्रमांक – ११
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-माहिती व जनसंपर्क
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.प्रशासन अधिकारी यांचे जावक क्र.माजसं/३/कावि/२०१/२०१७ दि.२१/४/२०१७

मा.प्रशासन अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भगवान महावीर जयंतीनिमित्त रविवार, दि.०९/०४/२०१७ रोजी प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने संबंधितांचे मानधन प्रेक्षागृह भाडे, मान्यवर चहापान, नाष्टा भोजन व्यवस्था, स्टेज,फ्लेक्स,बॅनर व रांगोळी इ.साठी थेट पध्दतीने होणा-या अंदाजे र.रु.८२,२५९/- (अक्षरी र.रु.ब्याऐंशी हजार दोनशे एकोणसाठ फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३०१ विषय क्रमांक – १२
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/२१/२०१७ दि.१५/०४/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०९/०१/२०१७ ते दि.१५/०१/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/२१/२०१७ दि.१५.०४.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३०२ विषय क्रमांक – १३
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-स्थापत्य
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३इ/कावि/१८५/२०१७ दि.२५/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६६/६/१६-१७ प्रभाग क्र.२९ इंद्रायणीनगर मध्ये क्रिडा विषयक दुरुस्ती करणेकामी मे.लालदिप कन्स्ट्रक्शन नि.र.रु.३५,०१,४००/- (अक्षरी र.रू.पस्तीस लाख एक हजार चारशे फक्त) पेक्षा १५.३०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.३१,१३,९७०/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३०३ विषय क्रमांक – १४
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग- स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/इमु/कावि/१८६/२०१७ दि.२५/४/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते ९) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

**निर्णय**–ज्या विषयांच्या रकमांमध्ये घट होते, असे विषय देखील स्थायी समितीपुढे आणावेत. मागील वर्षभरात मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये घट झालेली असल्यास किती रकमेची वसूली केली आहे याची माहिती मा.शहर अभियंता यांनी पुढील सभेत सादर करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३०४ विषय क्रमांक – १५
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/२७/२०१७ दि.१५/४/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१६/०१/२०१७ ते दि.२२/०१/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/२७/२०१७ दि.१५.०४.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३०५ विषय क्रमांक – १६
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/२८/२०१७ दि.१५/४/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२३/०१/२०१७ ते दि.२९/०१/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/२८/२०१७ दि.१५.०४.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३०६ | विषय क्रमांक – १७
दिनांक – ०३/०५/२०१७ | विभाग- मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.कैलास बारणे | अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/२९/२०१७ दि.१५/४/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.३०/०१/२०१७ ते दि.०५/०२/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/२९/२०१७ दि.१५.०४.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३०७ | विषय क्रमांक – १८
दिनांक – ०३/०५/२०१७ | विभाग- मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.लक्ष्मण उंडे | अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/२२/२०१७ दि.१५/४/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०६/०२/२०१७ ते दि.१२/०२/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/२२/२०१७ दि.१५.०४.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३०८ | विषय क्रमांक – १९
दिनांक – ०३/०५/२०१७ | विभाग- मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.उत्तम केंदळे | अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/३०/२०१७ दि.१५/४/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१३/०२/२०१७ ते दि.१९/०२/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/३०/२०१७ दि.१५.०४.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३०९ | विषय क्रमांक – २०
दिनांक – ०३/०५/२०१७ | विभाग- मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी | अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/३१/२०१७ दि.१५/४/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२०/०२/२०१७ ते दि.२६/०२/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/३१/२०१७ दि.१५.०४.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ३१० विषय क्रमांक – २१
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग- मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/३२/२०१७ दि.१५/४/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२७/०२/२०१७ ते दि.०५/०३/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/३२/२०१७ दि.१५.०४.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

**निर्णय-** सर्व विभागांच्या सगळ्या फाईल्स मुख्यलेखापरिक्षण विभागात इन (जमा) झाल्या पाहीजेत. म्हणजे नक्की काय अडचण आहे ते कळेल. सर्व विभागांना एकदा संधी दिली आहे, पुन्हा पुन्हा या विषयाचा उल्लेख टाळावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३११ विषय क्रमांक – २२
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग- पाणीपुरवठा
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१५१/२०१७ दि.१८/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.१२/७/२०१६-१७ अन्वये पि.चिं.म.न.पा.चे अशुध्द जल उपसा केंद्र, रावेत येथे टप्पा क्र 3 आणि 4 अंतर्गत पंपींग मशिनरीची वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी मे. फ्लोमँक इंजिनिअरिंग कोर्पोरेशन निविदा रक्कम रू.२७,३७,७०६/- (अक्षरी र.रू.सत्तावीस लाख सदोतीस हजार सातशे सहा फक्त) पेक्षा १०.००% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२५,८७,१३२/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३१२ विषय क्रमांक – २३
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग- पाणीपुरवठा
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१७०/२०१७ दि.२५/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.१२/१८/२०१६-१७ अन्वये पि.चिं.म.न.पा.चे अशुध्द जल उपसा केंद्र, रावेत येथे टप्पा क्र.1 आणि 2 अंतर्गत पंपींग मशिनरीची वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी मे. फ्लोमँक इंजिनिअरिंग कोर्पोरेशन निविदा रक्कम रू.४६,२५,९२९/-(अक्षरी र.रू.शेहचाळीस लाख पंचवीस हजार नऊशे एकोणतीस फक्त) पेक्षा १२.००% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.४२,७४,२६६/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व

निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३१३ विषय क्रमांक – २४

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग- पाणीपुरवठा

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१६९/२०१७ दि.२५/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या निविदा क्र.३/३८/२०१६-१७ अन्वये डुडुळगाव टाकीवरून पाणीपुरवठा होणा-या भागात वितरण नलिका टाकणेकामी मे. अजवाणी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. निविदा रक्कम रू.२७,९८,६६३/- (अक्षरी र.रू. सत्तावीस लाख अठ्ठयान्नव हजार सहाशे त्रेसष्ट फक्त) पेक्षा ५.७५% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२७,६९,६२६/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३१४ विषय क्रमांक – २५

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग- करआकारणी व करसंकलन

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कर/मुख्य/०३/कावि/१६७/२०१७ दि.२६/०४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड मनपाच्या करसंकलन विभागामार्फत राबविणेत आलेल्या मिळकतकर वसुली विशेष मोहिमे अंतर्गत दिनांक 16/03/2017 ते 31/03/2017 अखेर ऑटोरिक्षा/इको वाहन व स्पिकर पुरवठाधारक यांनी एकूण 16 दिवस वाहन व स्पिकर सेट पुरविलेले आहे. त्याचप्रमाणे मिळकतीची प्रत्यक्ष जप्ती करणेकामी दिनांक 24/03/2017 ते 31/03/2017 अखेर 04 खाजगी वाहने भाडेतत्वावर घेणेत आलेली आहेत. त्याकामी अनुक्रमे एकूण र.रु.1,60,000/- व र.रु.48,000/- इतका खर्च झालेला आहे. वरीलप्रमाणे खर्च 'वाहन भाड्याने घेणे' या लेखाशीर्षातील तरतुदीमधून करणेस तसेच, दिनांक 15/3/17 ते 31/3/17 अखेर 17 दिवस 8x8 साईजचे बोर्ड छपाई करून प्रसिद्धी करणेत आलेले आहे. त्याकामी एकूण र.रु.54,720/- इतका खर्च आलेला आहे. सदरचा खर्च 'मिळकतकर वसुली खर्च' या लेखाशीर्षातील तरतुदीतून सदरील सर्व खर्च निविदा न मागविता करारनामा न करता थेट पद्धतीने करणेत आलेला असल्याने सदरच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३१५ विषय क्रमांक – २६
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग- स्थापत्य BSUP प्रकल्प
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/BSUP प्र/१४८/२०१७ दि.२५/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून वेताळनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प इमारत क्र. A2 या इमारतीकरीता MPCB चा Consent to Operate मिळणेसाठी र.रु.१५,०००/- व फॉर्म फी र.रु.१००/- असे एकुण र.रु.१५,१००/- महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे जमा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय-** स्थायी समिती प्रशासन विभागाने श्री.संजय कुलकर्णी यांचेबाबत सर्व प्रकरणांत जो अहवाल असेल, शो कॉज नोटीस असेल, पुढील वेळी विषयपत्रिकेवर विषय आणावा. प्रशासनाने कायद्याच्या चौकटीत राहून त्यांचे जे काही मत असेल ते सांगायचे आहे. पुन्हा या विषयावर चालढकल करु नये. पिंपरीतील एक नगरसेवक मा.संदीप वाघेरे यांनी एसटीपीचे पंपिंग स्टेशन बंद असल्याची तक्रार केली आहे. आपले पंपिंग स्टेशन्स बंद असल्यामुळे मैलामिश्रित पाणी थेट नदीमध्ये सोडले जाते. त्यामुळे नदीमध्ये हायसिंथ वाढते. हे पर्यावरण विभागाचे काम आहे. त्यांनी व्हिजिट केली पाहीजे. पंपिंग स्टेशन्स कसे बंद आहेत, हे पाहिले पाहिजे. मा.कुलकर्णी, कार्य.अभियंता, पर्यावरण यांनी इकोमॅन मशिन दोन दिवसांत महापालिकेच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३१६ विषय क्रमांक – २७
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग- माहिती व तंत्रज्ञान
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/१२/कावि/१११/२०१७ दि.२५/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे Smart City Proposal तयार करणेकामी Offering services of DCF for Preparation of Smart City Proposal through Citizen Engagement and War Room Setup चे कामकाज करणेसाठी मे. DCF Advisory Services Pvt. Ltd, Bandra West, Mumbai 400 050 यांना रक्कम रुपये १,५०,०००/- + १५% सेवाकर (अथवा प्रत्यक्षात लागू कर) अथवा प्रवास खर्च, निवास खर्च व Out of Pocket Expenses इ प्रत्यक्ष खर्चाची बिले प्राप्त झालेनंतर जी कमी रक्कम असेल ती, कामाचा करारनामा न करता व थेट पद्धतीने अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३१७ विषय क्रमांक – २८

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग- मध्यवर्ती औषध भांडार

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मऔभां/१/कावि/९३/२०१७ दि.२६/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

म.न.पा.दवाखाने/रूग्णालयांसाठी आवश्यक असणा-या औषधे/साहित्यासाठी करणेत आलेल्या र.रू.११ कोटीच्या तरतुदीमधुन निविदा क्र.२/२०१६-१८ च्या मान्य लघुत्तम दरानुसार र.रू.२,८२,३५,१९८/- चे औषधे/साहित्य खरेदी खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –३१८ विषय क्रमांक – २९

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/७/कावि/५३८/२०१७ दि.२५/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये दरमहा एकत्रित मानधनावर ६ महिन्याकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन लेखी परिक्षा घेवुन प्रस्तावात नमूद विविध पदे भरणेस व सदर पदाला अनुभवानुसार मानधन अदा करणेस व जर आवश्यक तेवढे उमेदवार न मिळाल्यास पुढील ६ महिने सदर पदासाठी Walk in interview ने भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –३१९ विषय क्रमांक – ३०

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/७/कावि/५६३/२०१७ दि.२६/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयातील कामाचा व्याप पाहता मागील ६ महिन्यात मानधनावर जे कर्मचारी नेमलेले आहेत. त्यांची मुदत दि.२१/०४/२०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने प्रस्तावात नमुद केलेल्या पदांसाठी दर्शविलेप्रमाणे नियुक्त केलेले मानधनावरील मेडीकल ऑफिसर (BTO) व ब्लड बँक टेक्निशियन यांना विशेष बाब म्हणून दि.२२/०४/२०१७ रोजी १ दिवस सेवा खंडीत करुन दि.२३/०४/२०१७ पासुन दि.२२/०५/२०१७ पर्यंत पुढे १ महिना कालावधीसाठी मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३२० विषय क्रमांक – ३१

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/७/कावि/५६१/२०१७ दि.२४/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयातील कामाचा व्याप पाहता मागील ६ महिन्यात मानधनावर जे कर्मचारी नेमलेले आहेत. त्यांची मुदत दि.२०/०२/२०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने प्रस्तावात नमुद केलेल्या पदांसाठी दर्शविलेप्रमाणे नियुक्त केलेले मानधनावरील मेडीकल ऑफिसर (BTO) व ब्लड बँक टेक्निशियन यांना विशेष बाब म्हणून दि.२१/०२/२०१७ रोजी १ दिवस सेवा खंडीत करुन दि.२२/०२/२०१७ पासुन दि.२१/०४/२०१७ पर्यंत पुढे २ महिने कालावधीसाठी मुदतवाढीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३२१ विषय क्रमांक – ३२

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-बी.आर.टी.एस.

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बीआरटीएस/७९/२०१७ दि.२६/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

बीआरटीएस विभागामार्फत बांधणेत येणा-या सांगवी किवळे रस्ता कावेरी नगर येथे सबवे बांधणे या कामावर देखरेख करणेकामी मे. इन्फ्राकिंग कन्स्लटिंग इंजि.प्रा.लि. यांची निविदा पश्चात कामे करणेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणेस व या कामासाठी निविदा पश्चात (Post Tender) कामाकरिता स्विकृत निविदा रक्कमेच्या १.४५% अधिक सेवा कर अशी फी मनपाच्या प्रचलित दरानुसार अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३२२ विषय क्रमांक – ३३

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जेएनएनयुआरएम/३/कावि/७/२०१७ दि.२६/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.गुड गर्व्हनन्स इंडिया फाऊंडेशन यांचे तर्फे आयोजित 14$^{th}$ International Exhibition and Conference Municipalika - Smart And Sustainable Cities 2017 दि.१८ मे २०१७ ते दि.२० मे २०१७ या कालावधीत, CIDCO Exhibition Centre, Vashi, Navi Mumbai येथील परिषदेकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा १८ स्क्वेअर मी. इतक्या आकाराचा स्टॉल उभारणीकामी एकूण र.रू.३,२६,६००/-(अक्षरी रक्कम रूपये तीन लाख सव्वीस हजार सहाशे फक्त) मे. गुड गर्व्हनन्स इंडिया फाऊंडेशन यांना आगाऊ अदा करणेस तसेच इतर आवश्यक खर्चासाठी र.रू.५०,०००/- इतकी रोख आगाऊ रक्कम मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे नावे अदा करणेस व सदरचा खर्च माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील “स्मार्ट सिटी”या लेखाशिर्षामधून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ३२३ विषय क्रमांक – ३४
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-माहिती व तंत्रज्ञान
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जेएनएनयुआरएम/३/कावि/१०१/२०१७ दि.२६/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

जेएनएनयुआरएम टप्पा क्र.१ मधील BRTS काळेवाडी फाटा देहू आळंदी व BRTS नाशिक फाटा - वाकड हा प्रकल्पांचे अनुषंगाने मंजुर अनुदानापैकी केंद्र शासनाने राखून ठेवलेली १०% रक्कम प्राप्त होण्यासाठी महानगरपालिकेस व राज्य शासनास Reforms पुर्ण करावयाचे होते. सदरहू Reforms पुर्ण झालेने उक्त नमुद प्रकल्पांची उर्वरित १०% राखून ठेवलेली अनुदानाची रक्कम मनपास प्राप्त होणेसाठी केंद्र शासनाचे, नगरविकास विभाग येथे आवश्यकतो पाठपुरावा करणेकरीता शुक्रवार दि.१०/२/२०१७ रोजी नवि दिल्ली येथे उपस्थित राहणेकरीता व पुणे-दिल्ली-पुणे विमान प्रवास करणेकामी आलेल्या खर्चाची श्री. निळकंठ पोमण, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी स्वखर्चाने केलेल्या र.रू.१८,२३०/- (अक्षरी र.रू. अठरा हजार दोनशे तीस फक्त) खर्चाची प्रतिपुर्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३२४ विषय क्रमांक – ३५
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.उत्तम कैंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/८४/२०१७ दि.२७/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६३/४/२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र.६२ फुगेवाडी स्मशानभूमी लगतच्या रस्त्यास रिटेनिंग वॉल बांधणेकामी मे.चैतन्य एन्टरप्रायझेस नि.र.रू.28,01,120/- (अक्षरी रक्कम रुपये अठ्ठावीस लाख एक हजार एकशे वीस फक्त) पेक्षा 17.99% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.24,12,058/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३२५ विषय क्रमांक – ३६
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-ड क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.डक्षे/७/कावि/३०८/२०१७ दि.२७/०४/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतुक करणेचे कामांसाठी निविदेतील लघुत्तम ठेकेदार मे. जयगणेश एंटरप्रायझेस, पिंपरीगांव यांना मोशी कचरा डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.४४५०/- व भोसरी कचरा डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.४२५०/- या दराने ९ ट्रक वाहने दि.१६/१०/२०१७ अखेर

उपलब्ध करुन देणेकामी कामाचे आदेश देण्यात आले आहे. ९ ट्रक वाहने याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा. स्थायी समिती सभेने ठराव क्र.१८०४० दि.१५/१०/२०१६ अन्वये मान्यता दिलेली आहे. सन्मा. सदस्य व आरोग्य निरिक्षक मुख्य आरोग्य निरिक्षक यांनी प्रभाग क्र.४४ व ४५ मध्ये २ वाढीव टाटा एसीई वाहने व प्रभाग क्र.४८ मध्ये २ टाटा एसीई वाहनांची मागणी केलेली आहे. ड क्षेत्रीय कार्यालयाचे परिसरात मोठया प्रमाणात कुंटुंब संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे मोठया सोसाटयांमधील कचरा गोळा करणेकामी वाढीव २ ट्रक लावून सध्या काही सोसाटयांमधील कचरा गोळा करणा-या टाटा एसीई वाहने आवश्यक ठिकाणच्या लहान गल्ली बोळातील घरोघरचा कचरा गोळा करणेसाठी वापरता येतील. म्हणुन मे.जयगणेश एंटरप्रायझेस यांचेशी कचरा उचलणे व हलविणे या कामांसाठी दि.०५/१०/२०१६ रोजी प्रतिदिन ९ ट्रक वाहने पुरविणेकामी करणेत आलेल्या करारनामा अट क्र.३२ नुसार मनपास कामासाठी जादा वाहनांची आवश्यकता असल्यास मा.सह आयुक्त यांच्या पुर्व परवानगीने मान्य दरामध्ये जादा टिपर वाहने उपलब्ध करुन घेण्याची अट आहे. त्यानुसार मे. जयगणेश एंटरप्रायझेस, पिंपरीगांव यांचेकडून मोशी कचरा डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.४४५०/- व भोसरी कचरा डेपोसाठी दर प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.४२५०/- या दराने आणखी २ वाढीव ट्रक वाहने दि.१६/१०/२०१७ अखेर उपलब्ध करुन घेणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय**- नवीन ई.सी. नियमाप्रमाणे शहरातील मोठ्या सोसायट्यांनी त्यांच्याकडे गोळा होणा-या कच-यावर प्रक्रिया केली पाहिजे. यासंदर्भात सोसायट्या ई.सी. नियमाचे पालन करत नसतील तर आपण परवानगी देऊन उपयोग नाही. अन्यथा त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३२६ विषय क्रमांक – ३७

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग- मुख्यलेखापरिक्षण

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/३५७/२०१७ दि.२७/४/२०१७

मुख्य लेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३२७ विषय क्रमांक – ३८

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग- विद्युत मुख्यालय

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/मुका/तांमा-२/१४६/२०१७ दि.२५/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या प्रशासकीय इमारतीमधील नविन महापालिका सभागृहासाठी वापरात असलेल्या उद्वाहकाची वार्षीक पद्धतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी 2017/18 मे. कोने मेक हे काम उत्पादीत कंपनी मे.कोने इलेव्हेटर इंडीया प्रा लि., पुणे. यांचेकडुन निविदा न मागविता थेट पद्धतीने परंतु रितसर करारनामा करुन घेणेस व त्यापोटी येणारा खर्च रक्कम रुपये 2,13,292/- (अक्षरी र.रू. दोन लाख तेरा हजार दोनशे ब्यान्नव फक्त) चे खर्चास व सदरची रक्कम आगाऊ अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ३२८ विषय क्रमांक – ३९
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग- वैद्यकीय मुख्य कार्यालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/३/कावि/३९६/२०१६ दि.२६/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण रुग्णालयामध्ये पदव्युत्तर वैद्यकिय शिक्षण संस्था सुरु करण्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे. याकरीता मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या मानांकाप्रमाणे कार्यवाही करण्याकरिता रजिस्ट्रार पदाचे वरिष्ठ निवासी, हाऊसमन पदाचे कनिष्ठ निवासी व बंधपत्रित वैद्यकिय अधिकारी पदाचे सहाय्यक प्राध्यापक असे पदनाम बदलण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३२९ विषय क्रमांक – ४०
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग-मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/७/कावि/३४६/२०१७ दि.२७/४/२०१७
विषय - मनपाचे आरोग्य विभागास हॅंगींग लिटरबीन्स खरेदीबाबत...

विषय क्रमांक ३९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय**- स्थापत्य विभागाला कडक आदेश आहेत की, पावसाळ्यापूर्वी लक्ष देऊन नाला साफसफाई, गटर साफसफाईचे काम पूर्ण करावे. दि.१६ जूनला पालखी शहरात येते आहे. नद्यांमधील हायसिंथ काढायचे काम युद्ध पातळीवर करावे. शहरातील नाले साफसफाई मोठ्या प्रमाणावर करावी. याबाबतीत जलनिःसारण विभागाने जास्तीत जास्त काळजी घ्यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -</u>**

ठराव क्रमांक – ३३० विषय क्रमांक – ४१
दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग- पाणीपुरवठा
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/कावि/८७/२०१७ दि.३/०५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

जे.एन.एन.यु.आर.एम.अंतर्गत शहराच्या ४०% भागात २४ X ७ पाणीपुरवठा योजना राबविणेचा प्रकल्प पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने हाती घेतला आहे. सदर कामांअतर्गत पेठ क्रमांक २३ येथील जलशुध्दीकरण केंद्र ते डांगे चौक या दरम्यान १००० मिमी व्यासाची पाण्याची नलिका टाकण्याचे काम प्रस्तावित आहे. सदर काम प्रगतीपथावर असून पेठ क्रमांक २६ येथील पीसीसीओई कॉलेज येथे सदर नलिका रेल्वे क्रासिंग करुन पलीकडे नेणे आवश्यक आहे. त्या संदर्भात रेल्वेकडे पाठपुरावा करण्यात येत होता. त्यानुषंगाने रेल्वेने Way leave and departmental charges पोटी र.रु. १४,३५,८५०/- इतकी रक्कम दिनांक १०/०५/२०१७ पूर्वी अदा करण्याबाबत संदर्भ क्रमांक १ अन्वये

कळविलेले आहे. तथापि सदरची रक्कम दिनांक १०/०५/२०१७ पर्यंत अदा करणे शक्य नसल्याने त्यासाठी काही दिवसांची मुदतवाढ मिळण्याबाबत रेल्वेला कळवून संबंधित अधिका-यांना समक्ष भेटून कल्पना देण्यात आलेली आहे.

प्रस्तूत प्रकरणी रेल्वेने कळविल्याप्रमाणे र.रु.१४,३५,८५०/- इतकी रक्कम रेल्वेकडे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३३१ विषय क्रमांक – ४२

दिनांक – ०३/०५/२०१७ विभाग- नागरवस्ती विकास योजना

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/०३/कावि/१९३/२०१७ दि.३/०५/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला बालकल्याण योजनेअंतर्गत विधवा व घटस्फोटित महिलांना अर्थसहाय्य देणे या योजनेकरिता र.रु.६०००/- अर्थसहाय्य एकदाच देणेत येते. सन २०१५-१६, २०१६-१७ या आर्थिक वर्षातील अपात्र लाभार्थ्यांनी कागदपत्रांची पुर्तता केल्याने पात्र लाभार्थींना अर्थसहाय्य देणे आवश्यक असलेने सोबत जोडलेल्या प्रपत्रातील २८९ लाभार्थ्यांना प्रत्येकी रक्कम ६०००/- याप्रमाणे लाभ देणे व त्याकामी येणा-या रक्कम रु.१७,३४,०००/- (अक्षरी सतरा लाख चौतीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर योजना बारा महिने सुरु असल्याने जसजसे अर्ज प्राप्त होतील व पात्र होतील त्याप्रमाणे पात्र लाभार्थ्यांना सन २०१७-१८ या चालू आर्थिक वर्षात ३१/३/२०१८ पर्यंत प्रत्येकी रक्कम रु.६०००/- प्रमाणे अर्थसहाय्य देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/३६/२०१७
दिनांक - १५/०५/२०१७

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.